**सं.फौ.ख.नं.८३९/२०२४**

**निशाणी क्र. ३२**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ याचे सत्यप्रतिज्ञेवर कथन.**

नाव- ताराचंद युवराज चांगण,

वय- ४४ वर्षे, धंदा- प्रभारी शाखा व्यवस्थापक,

रा.- जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा.

**फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा सरतपास विधीज्ञ श्रीमती एम.ए.अहिवळे यांचेमार्फत सुरु–**

माझे शिक्षण एम.ए.पर्यंत झालेले आहे. मी विदयानंद को.ऑप.बँक लि. सोलापूर, शाखा फलटण येथे व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहे. अरुण हणमंत गिरी हे आमचे खातेदार आहेत. त्यांना मी खातेदार असल्याने ओळखतो. मला आलेले साक्षीसमन्स आजरोजी मी घेवून आलेलो आहे व यादीने दाखल केलेले आहे. साक्षीसमन्स सोबत मी आरोपीचा खाते उघडण्याचा अर्ज, त्यांचे अकाऊंटचे स्टेटमेंट, आरोपीच्या चेकची व रिटर्न मेमोची इमेज प्रत दाखल केली आहे. सर्व कागदपत्रे ही व्हेरिफाईड केलेली आहेत. आरोपीचे चालू खाते आहे. सदरचे खाते हे कपडयाचे दुकानासाठी उघडले होते. आरोपीने त्याचे खाते सन २०१९ साली उघडले आहे. आरोपीचे सहीच्या नमुन्याचे कार्ड मी दाखल केलेले आहे. या कार्डवरील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही व शिक्का आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येत आहे.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने सरतपास मध्यान्ह वेळ संपेपर्यंत तहकुब करणेत येत आहे.**

**मध्यान्हानंतर सरतपास पुन्हा शपथेवर सुरु-**

आता मला विदयानंद को. ऑप. बँक लि.सोलापूर येथील आरोपी यांनी खाते उघडलेला अर्ज दाखवण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यास **नि.क्र. ३४** देण्यात येत आहे. आता मला डिक्लेरेशन फॉर्म दाखवण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी सही व शिक्का असून त्यास **नि.क्र.३५** देण्यात येत आहे. आता मला आरोपीचे शॉप ॲक्ट लायसन्स दाखवण्यात आले. ते तेच असून त्यास **नि.क्र.३६** देण्यात येत आहे. आता मला विदयानंद को.ऑप. बँक लि. सोलापूर यांचा के.वाय.सी. फॉर्म दाखवण्यात आला.

त्यावर आरोपीचा फोटो व सही आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे. आता मला आरोपीचे पॅनकार्डची पडताळणी प्रत दाखवण्यात आली. ती तीच असून त्यास **नि.क्र.३८** देण्यात येत आहे. आता मला आरोपीचे आधारकार्डची पडताळणी प्रत दाखवण्यात आली. ती तीच असून त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे. आता मला आरोपीचा विदयानंद को. ऑप. बँक लि. मध्ये असणा-या खाते उता-याची प्रत दाखवण्यात आली. ती तीच असून त्यास **नि.क्र.४०** देण्यात येत आहे. आता मला खातेउता-यावरील पा.क्र.९ दाखवण्यात आले. त्यानुसार कांचन देशपांडे यांचा वटणावळीसाठी दि.२९.०१.२०२४ चा चेक आला होता. परंतु, तो अपुरी रक्कम या कारणास्तव वटला नाही. सदरचा चेक हा मला ऑनलाईन पद्धतीने आला होता. आता मला चेकची ईमेज दाखवण्यात आली. तो तोच असून त्यास **नि.क्र. ४१** देण्यात येत आहे. सदरचा चेक हा श्रीमंत मालोजीराजे सहकारी बँक लि. शाखा फलटणचा आला होता. सदरचा चेक न वटल्यामुळे आरोपीला आम्ही अपुरी रक्कम असा शेरा मारुन मेमो परत पाठवलेला आहे. आता मला तो चेक रिटर्न मेमो दाखवण्यात आला. तो तोच असून त्यास **नि.क्र.४२** देण्यात येत आहे. आरोपीला चेक न वटल्याबाबतचा संदेश हा मोबाईलवर देण्यात आला होता. मी विदयानंद को.ऑप बँक लि. येथे २००२ पासून कार्यरत आहे. फलटण शाखेत मी २०१६ पासून कार्यरत आहे. सन २०२०-२०२२ साली कर्जाचा व्याजदर हा ११ ते १८ % पर्यंत होता. सद्यस्थितीत कर्जाचा व्याजदर हा ११ ते १६ % एवढा आहे. सन २०२०-२०२२ च्या दरम्यान एफ.डी.चा व्याजदर हा १० ते ११ % एवढा होता. आरोपीचा चेक न वटण्याचे कारण हे अपुरी रक्कम हेच आहे. याशिवाय इतर कोणतेही कारण नाही. मी आज आणलेली माहिती ही सिस्टीम जनरेटर डाटा यामधून आणलेली आहे.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी व आरोपीतर्फे विधीज्ञ यांना वारंवार पुकारले असता गैरहजर. सबब, उलटतपास तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (श्रीमती के.आर.पाटील)

ता. १७/०३/२०२५ ६वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण